# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/12/2023 (गुरूवार) सकाळ

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत वाईन शॉप बियर बार जवळ कांद्री कन्हान येथे दि. १३/१२/२०२३ चे १५.१० वा. ते १५.२६ वा. दरम्यान फिर्यादी नामे– तनूश चंद्रशेखर कांबळे वय २७ रा प्लाट नं ५४६ खदान लेआउट बेजनबाग हा कंपनीचे रिजनल मॅनेजर राहुल सिंग मनसिंग हजेरी यांची RENOLD Kiger MH-26-BX7167 कारनी दोघेही रामटेक येथे जाण्यास निघाले व रामटेक येथून नेहा ट्रेडर्सच्या मालकाने फिर्यादीला सिमेंटच्या बिलाचे १ लाख रूपये डिट्रीब्युटरला देण्यास दिले होते ते पैसे फिर्यादीने आपल्या कॉलेज बॅग मध्ये कारच्या मागच्या सिटवर लॅपटॉप बॅगच्या बाजूला ठेवले होते व दोघेही कारने नागपूरला जाण्यास निघाले व फिर्यादी हे नाश्ता करायला वाईन शॉप बियर बार जवळ रोडच्या कडेला गाडी उभी करून ओम रेस्टॉरेंट येथे नाश्ता करायला गेले व नाश्ता करून कार जवळ आले तेव्हा कारचा समोरील चक्का पंचर झालेला दिसला व मागील काच फोडलेला दिसला व मागच्या सिटवर ठेवलेले लॅपटॉप व रक्कम १ लाख रूपये ठेवलेली बॅग दिसली नाही. फिर्यादीचा AVITA कंपनीचा लॅपटॉप किंमती २२०००/– रू व १ लाख रू ठेवलेली बॅग असा एकुण १,२२,०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पाल मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा परसोडी शिवार येथे दि. ११/१२/२०२३ चे १८.३० वा. ते दिनांक १३/१२/२०२३ चे १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– राकेश गंगाधर ईखार वय ३९ वर्ष रा. एच. पी पेट्रोलपंप शिवाजी वार्ड क्र. ०५ कळमेश्वर याने शेताचे रूम मध्ये ५० क्विंटल कापुस ठेवला होता. कोणीतरी अज्ञात चोराने ५० क्विंटल कापुस मधुन अंदाजे २० क्विंटल कापुस किंमती १,४०,०००/– रू चोरी करून नेले आहे. फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. गाढवे मो क्रं ९३७१७७०२१५ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. खापा** :— अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा वाकी वाकोडी व रामडोंगरी शिवार येथे दिनांक १०/१२/२०२३ रोजी मध्यरात्री २/०० वा. सुमारास महावितरण कंपनीचे खापा ग्रामिण विज वितरण केंद्र अंतर्गत येणाऱ्या मौजा रामडोंगरी येथील अमोल धाडे याचे शेतातील एम. एस. ई. डी. सी. एल लघूदाब विज वाहीनीचे तार अंदाजे ६०० मीटर अंदाजे किंमती २१०००/— रू रामडोंगरी शिवारातील फॉरेस्ट नर्सरी येथिल एम. एस. ई. डी. सी. एल लघूदाब विज वाहीनीचे तार अंदाजे २०० मीटर किंमती ७०००/—रू तसेच वाकी दरबार रोड १०० के. व्ही. वायचा टान्सफार्मचे खाली कोणत्यातरी धारदार वस्तूने कापून अंदाजे १९० लीटर ऑईल किंमती ५०००/—रू असा एकूण ३३०००/—रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरानी रात्री दरम्यान चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शारूख मेहमूद्दीन तूरक, वय ३१ वर्ष नूरी कॉलनी नारा रोड नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार विशाल महालकर हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**